आर.डी. क्र.२०/२०१०
हबिब वि. शशिधरण
नि.क्र.१०९ चा भाग

**ऋणकोतर्फे साक्षीदार क्र.०२ चा उलटतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -सिकंदर खान हमीद खान पठाण

**<u>उलटतपास शपथेवर धनकोतर्फे अॅड. श्री.एल.आर.मांडवकर यांच्या मार्फत सुरू.</u>**

**५.** मला सिकंदर ऑटोमाबाईल मौजा मंगळवारी पेठ,उमरेड चा नगरपरिषद मालमत्ता क्रमांक आठवत नाही. मला त्याचा सि.टी.सर्व्हे नंबर आठवत नाही. मला सदर मिळकतीच्या आजुबाजुचे मिळकतीचे नंबर माहित नाही. सदर मिळकत माझ्या वडीलांनी सन १९८४ मध्ये खरेदी करून घेतली होती. सदर खरेदीखत माझ्याजवळ आहे. सदर खरेदीख्तामध्ये सदर मिळकतीच्या चतर्सिमा नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर मिळकतीचे खरेदीखत अभिलेखावर दाखल केलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, माझ्या स्वत:च्या दुकानाचे खरेदीखत मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. सदर खरेदीखतांमध्ये मिळकतीचा काय सि. टी. सर्व्हे नंबर आहे हे मला आठवत नाही.

**६.** सिकंदर ऑटोमाबाईल हे दुकान पुर्वी माझे वडील चालवत होते. धनकोनी जी जागा खरेदी केली होती ती जागा पुर्वी धनजीभाई पटेल यांची होती. हे मला माहित नाही की, शशिधरन याने सदर धनजीभाईवर करारपुर्तीसाठी दावा केला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, सदर दाव्यामध्ये माझे वडील यांनी शशीधरनमार्फत साक्ष दिली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, सदर दावा खारिज झाला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, धनजीभाई यांची जी मिळकत होती तिच मिळकत हबिब खान यांनी खरेदी करून घेतली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये वादमिळकतीच्या ज्याचतुर्सिमा दाखविलेल्या आहेत त्या चुकीच्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, हबिब खान यांच्या मिळकतीला लागुन माझी मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीच्या कोणत्या बाजुने माझी मिळकत आहे ही बाब अभिलेखावर येउ नये म्हणुन मी सि.टी.सर्व्हे व माझ्या जागेचे विक्रीपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, ज्यावेळेस न्यायालय सदर खरेदीखत व सि.टी.सर्व्हे मागेल त्यावेळेस मी न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. मी आजरोजी माझ्या मिळकतीचे खरेदीखत व सि.टी.सर्व्हे रेकॉर्ड न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील

चतुर्सिमेबाबत मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि.न्यायाधीश क.स्तर,उमरेड
दि.२२.०४.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि.न्यायाधीश क.स्तर,उमरेड
उमरेड